“ नांदेड जिल्हयातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन ”

(सन 2011-12 ते 2021-22)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्यविद्याशाखे अंतर्गत “अर्थशास्त्र” विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

किरण बाबुराव फुगारे

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. प्रा. मोहोकार हरिहर शिवदास

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको, नांदेड.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2022

" नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन " (सन 2011-12 ते 2021-22)

प्रस्तावना

खूप पूर्वीच्या काळापासून मानव आपली उपजीविका भागवण्यासाठी काम करत आहे. मानवाला कोणत्याही सजीवाप्रमाणे अन्ना बरोबरच वस्त्र व निवारा अशा बाबींची गरज वाटत होती. यासाठी मानवाने आपापसात कामे विभागून घेतली व आपल्या बरोबर इतरांचे काम करण्याच्या माध्यमातून तो कामगार बनला. कामे व परिस्थिती बदलून विनिमयाचे साधन आले. नागरीकरण, शहरीकरण, औद्योगीकरण व आधुनिकीकरण यामुळे सर्व बदलत गेले. समाज तयार होत असताना मानवाने एका व्यवस्थेसाठी आपल्या सोयीसाठी नियम, कायदे कानुन तयार केले. कामगारांसाठी त्यांच्या कुटुंबांसाठी काही कल्याणकारी कायदे तयार करण्यात आली. त्यानुसार त्यांना सुट्या , रजा देण्यात आल्या पगार-मोबदल्यात निश्चितता आणण्यात आली. वाढत्या महागाईनुसार त्यात वाढी सुचवण्यात आल्या. याशिवाय पेन्शन ,भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्युटी अशांचा अंतर्भाव करण्यात आला. या साऱ्याला सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि अधिकार यांचे संदर्भ जोडण्यात आले. पाश्चिमाते देशात हे आधी घडल्यानंतर त्याचे पडसादे आपल्या भारतातही उमटले.सर्व कामगारांनो एक व्हा असा नारा देणाऱ्या कार्ल मार्क्सने कामगारांच्या सत्तेची स्वप्न पाहिले. याच अनुषंगाने जगातल्या अनेक देशात क्रांती घडल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 15 ऑगस्ट 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना कामगारांची श्रमाची किमान मर्यादा ठरवून देण्यासाठी, कामाचे तास कमी करण्यासाठी, शेतमजूर, शेतकरी खोती व तालुकादारिपुळे यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी गिरण्या व कारखान्यातील नोकरीची शाश्वती व बढती यांची कायदेशीर तरतूद करण्यासाठी, कामाची योग्य वेतनासाठी, पगारी रजा, आजारीपणात भत्ता, वृद्धपणी पेन्शन अपघाताबद्दल नुकसान भरपाईसाठी, बेकारीचा भत्ता, कामगारांसाठी स्वस्त भाड्याची, आरोग्यशीर घरे इत्यादी आवश्यक गोष्टींची तरतुद करुण शेतकऱ्यांचे व कामगारांचे कर्ज कमी करून व्याजाच्या दरावर व खोटे दस्तऐवज वगैरे करून घेण्याच्या बाबतीत नियंत्रण घालण्यासाठी , मध्यमवर्गीय लोकांसाठी घरभाड्याच्या कायदा करून घेणे इत्यादी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून अशा प्रकारची कामगारांची भूमिका मांडण्यात आली. दि. ७ ऑगस्ट १९४२ ला नवी दिल्लीमध्ये संयुक्त कामगार परिषदेच्या चौथ्या परिषदेचा वेगळेपणा म्हणजे प्रथमच शासन, प्रतिनिधी, मालक आणि कामगार यांचे

प्रतिनिधी समोरासमोर आले. हे मोठे यश असल्याचे ते सांगून म्हणतात कामगार कायद्यांचे एकत्रिकरण, औद्योगीकरण , विवाद समोपचाराने मिटणारी यंत्रणा विकसित करण्यासाठी आणि कामगार व मालक यांच्या दरम्यान देशपातळीवरील मुद्द्यांवर चर्चेसाठी व्यासपीठ निर्माण करणे ही आपल्या समोरील तीन प्रमुख उद्दिष्टे आहेत. बाबासाहेबांच्या धोरणामुळे त्रिपक्षीय स्थानिक समितीची स्थापना झाली.साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी १९५८ मध्ये बॉम्बे मध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात कामगाराबद्दल बोलताना त्यांनी "प्रथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे" असे सांगून त्यांनी कामगार वर्गाचे महत्त्व स्पष्ट केले.

पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत कामगारांची मोठी पिळवणूक व छळ झाला. श्रमाचे दर अतिशय कमी, कामाच्या तासावर नियंत्रण नव्हते, कारखान्याच्या ठिकाणी अप शब्दांचा वापर केला जात असे, या अन्यायाच्या विरोधात कधी कधी कामगार संप करीत असे, कामगारांच्या संघटना नसल्यामुळे सरकारी कायदेही नव्हते. त्यामुळे औद्योगिक संबंधाच्या बाबतीत त्या काळात कारखानदारीच्या हाती अनियंत्रित सत्ता होती.पहिल्या महायुद्धाच्या अखेरच्या काळात कामगार- मालक समित्या स्वच्छने ग्रेटब्रिटन फ्रान्स इत्यादी देशात विभाग संयंत्र व उद्योगांमध्ये प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर स्थापन करण्यात आल्या. औद्योगिक संबंधांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मालक व कामगार समित्या ग्रेटब्रिटन मध्ये व्हिटली समितीच्या शिफारशीनुसार स्थापन झाल्या. औद्योगिक भूमिकेमुळे कामगारांचे महत्त्व देशांना वाटू लागल्याने कामगारांना महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. बांधकाम उद्योग हा भारतातील स्थूल देशांतर्गत उद्योगात ११ टक्के योगदान देणार एक महत्त्वाचा उद्योग आहे. भारतामध्ये कृषी नंतर सर्वात जास्त रोजगार हा बांधकाम क्षेत्रामध्ये असल्याचे दिसून येते. जास्तीत जास्त लोकसंख्या ही बांधकाम व्यवसायात गुंतलेली आहे. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बांधकाम उद्योग अनेक व्यवसायांना चालना देत असते. जलद गतीने वाढणाऱ्या बांधकाम उद्योगात मोठ्या प्रमाणामध्ये कामगारांची गरज निर्माण होत आहे. भारतातील वाढत्या दुष्काळी परिस्थितीत, ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीचा अभाव याचा परिणाम म्हणून शहरी भागात बांधकाम उद्योगात अनेक मजूर स्थानांतर करीत आहेत. स्थानांतरित मजुरांमध्ये कुशल व अकुशल मजुरांचा समावेश अधिक आहे. अलीकडच्या काळात सरकारने बांधकाम उद्योगास चालना देणारी अनेक पावले उचललेली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करून या मंडळांतर्गत बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य करणे, अनुदान देणे, कामगारांच्या आर्थिक उन्नती करणे, कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे, कामगारांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रयत्न करणे, कामगारांना घरकुल देणे इत्यादी माध्यमातून कामगारांच्या आर्थिक सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी सरकारने या कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे.

बांधकाम कामगारांची माहीती व ओळख.

इमारत आणि इतर बांधकाम मजूर असंघटित कामगारांपैकी बांधकाम मजूर मोठा वर्ग आहे १९९९ ते २००० मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षणानुसार या प्रकारात १.७६ कोटी कामगार येतात. २०११ च्या जनगणने नुसार एकूण भारताची लोकसंख्या १२१ कोटी इतकी होती. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र भारतातील तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. भारतीय साक्षरता दर ७४.०४ टक्के आहे. त्यापैकी पुरुष साक्षरता दर ८२.१४ टक्के तर महिला साक्षरता दर ६५.४६ टक्के होता.तर महाराष्ट्रात ११.२४ कोटी लोकसंख्या होती तर ५४.७८ टक्के ग्रामीण भागात तर ४५.२२ टक्के शहरी भागात होते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ४.९४ कोटी कामगार होते. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण ३४ टक्के होते तर राष्ट्राच्या कार्यसहभागेत ३९ टक्के महिला आहेत. राज्यात एकूण लोकसंख्येशी मुख्यकाम करणाऱ्या लोकांची संख्या ३८.९४ टक्के आहे तर शेतीशी निगडित काम करणाऱ्या लोकांची संख्या ५२.७८ टक्के होती. यात महिलांचा सहभाग दर ३१.०६ टक्के होता. राज्यात बांधकाम कामगारांची संख्या ६.१ टक्के असून यापैकी ९.८ टक्के शहरी भागात तर ३.९ टक्के हे ग्रामीण भागात नोंदवले आहे.

भारतामध्ये जवळपास ५२ कोटी लोकसंख्या ही संघटित क्षेत्रात काम करते. त्यापैकी २२ कोटी लोकांनी शासनाकडे नोंद केली आहे.महाराष्ट्रच्या आर्थिक सर्वेक्षण २०१५- १६ नुसार महाराष्ट्रात १.०२ लाख बांधकाम आस्थापना अस्तित्वात आहेत. तसेच नोव्हेंबर २०१६ अखेरीस मंडळामध्ये ५.६२ लाख बांधकाम कामगारांची लाभार्थी म्हणून नोंदणी झाली. असून २.९९ लाख कामगारांची नोंदणी आजपर्यंत वैद्य आहे. तसेच २०११ च्या जनगणनेनुसार नांदेडची एकूण लोकसंख्या ३३,६१२९२ इतकी आहे तर यात साक्षरतेचे प्रमाण पुरुषांचे ८४.२७ व महिला साक्षरतेचे प्रमाण ६६.१५ इतका आहे. नांदेड जिल्हयात दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ नोंदणीकृत कामगार ५१,५८६ इतकी संख्या आहे. त्यामधून कार्यरत कामगारांची संख्या ३०,८९१ इतकी आहे. इमारतीच्या सुरुवातीच्या बांधकामापासून ते बांधकाम पूर्ण होईपर्यंत जे जे काम करतात त्यांना बांधकाम कामगार असे म्हणतात. त्यामध्ये खुदाई कामगार,सेंट्रींग कामगार, गवंडी कामगार,फींटींग (फरशी, इलेक्ट्रीकल)कामगार,पेंटींग कामगार,फर्नीचर, सुतार कामगार,फॉब्रीकेटर्स,इतर कामगार इत्यादी कामगारांचा सामावेश आसतो. इमारत व बांधकाम क्षेत्रातील कामामध्ये बदल, दुरुस्त्या, देखभाल किंवा तोडफोडे यांचा समावेश होतो. इमारती, रस्ते, रेल्वे, हवाई वाहतुकीच्या दृष्टीने कमे, कालवे, गटारे बंधारे व नौकापर्यटन यांची कामे पाहण्यासंबंधी विविध कामे, ऊर्जा वाहून नेणे आणि वितरित करणे, पूरनियंत्रित करणे, विजेसंबंधी कामे, तेल आणि वायू संबंधी कामे, पाईपलाईन्स, टॉवर्स, ट्रान्समिशन, जलप्रवाह, रेडिओ, टेलिव्हिजन, टेलिफोन, टेलिग्राफ आणि सागर संज्ञापन इत्यादी इमारत व बांधकाम कामगार क्षेत्रात

येतात.अशा बांधकाम कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कामगारांच्या रोजगार आणि सेवाच्या शर्तींचे नियम करण्याच्या उद्देशाने आणि बांधकाम व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी सुरक्षा, आरोग्य आणि उपाय प्रदान करण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारने कायदा लागू केला म्हणून इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियम व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियम व सेवाशर्ती) नियम २००७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने कामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने दि.१ मे २०११ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करुण या मंडळाच्या भुमीकेतुन बांधकाम कामगारांच्या सामाजिक,अर्थिक ऊन्नतीसाठीची शासनाची भुमिका दिसुन येते.

असंघटित क्षेत्राच्या व्याख्या NSSO ने ILO

असंघटित क्षेत्राच्या दोन भाग केले आहेत.

1. असंघटित क्षेत्र म्हणजे खाजगी आस्थापना म्हणजेच खाजगी उद्योग ज्या उद्योगात घरातील व्यक्ती गुंतलेल्या असतात. या आस्थापनेतील व्यक्ती वस्तू व सेवांचे उत्पादन करतात. व विक्री करतात. व्यवसाय वैयक्तिक किंवा भागीदारीमध्ये सुरू करता येतात. या अस्थापनेत 10 किंवा 10 पेक्षा कमी कामगार कार्यरत असतात.
2. .असंघटित क्षेत्रात कामगार की जे एखाद्या असंघटित उद्योगात किंवा घरगुती उद्योगात काम करतात त्या कामगारांना नियमित कामगारांना मिळणाऱ्या सामाजिक सुरक्षितता व कायदे (सुविधा) मिळत नाहीत.

   असंघटित क्षेत्राच्या व्याख्या असे असून बांधकाम कामगार हे असंघटित क्षेत्राशी निगडित असतात.

समस्या मांडणी

बांधकाम मजुरांचे अल्प शिक्षण, स्थानांतरण, कमी कौशल्य यामुळे ते शोषणाचे बळी ठरतात. कामाचे जास्त तास, अपुरे वेतन, व्यसनाधीनता यामुळे त्यांची स्थिती दयनीय आहे. बांधकाम व्यवसायामध्ये काम केल्यामुळे अनेक शारीरिक आजारपणांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे उत्पन्नावरील बऱ्याच प्रमाणात औषध उपचारावर होणारा खर्च मोठ्या प्रमाणात असतो. जे दुसऱ्यांना घर बांधून देतात अशा बांधकाम कामगारांच्या निवाऱ्याची स्थिती दयनीय आहे. बांधकाम कामगारांच्या वर्गाची समस्या व्यापक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. वर्तमान काळात या व्यवसायातील मजुरांची संख्या वाढल्याने

या व्यवसायातील कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन (सन २०११-१२ ते २०२१- २२) हा विषय निवडला आहे. व या योजनेअंतर्गत कामगारांना येणाऱ्या अर्ज प्रक्रियेच्या अडचणी बांधकाम कामगारांच्या मुलांना मेडिकलच्या व इंजिनिअरिंगच्या शिक्षणाप्रमाने दिले जाणारे अर्थसाय्य शिष्यवृत्ती इतर अभ्यासक्रमांसाठी का दिली जात नाही ? या योजनेच्या माध्यमातून बांधकाम कामगारांना आर्थिक ऊन्नतीचा लाभ होतो का ? कामगारांच्या जीवनात या योजनेची भूमिका काय ? या योजनेमुळे बांधकाम कामगारांच्या जीवनात आर्थिक सामाजिक विकासाला गती देणारी आहे का ? या योजनेमुळे बांधकाम कामगारांच्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणास चालना मिळाली का ? या योजनेचा शासनाच्या उद्दिष्टा प्रमाणे बांधकाम कामगारांना फायदा होतो का ? इत्यादी समस्यांचे अध्ययनाच्या दृष्टीने विषयाची निवड करण्यात आली आहे. बांधकाम कामगारांच्या या योजनेत येणाऱ्या समस्यावर कामगारांच्या विकासासाठी शासनाला विविध उपाय सुचविण्यात येतील व या योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांच्या विकासासाठी इतर योजना अंतर्भुत करण्यासाठी उपाय सुचविण्यात येणार असल्याने त्याचा शासनाला बांधकाम कामगारांच्या विकास साधण्यासाठी धोरण ठरवण्यास उपयोगी पडेल.

संशोधनाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा "नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन (सन २०११-१२ ते २०२१-२२) असा असून वर्तमान काळातील विचार केला असता वर्तमान काळातील रोजगार संधी फारशी उपलब्ध नाहीत, रोजगार संधी उपलब्ध करून देणाऱ्या उद्योगापैकी बांधकाम व्यवसाय हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. हा व्यवसाय इतर उद्योगांच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे इमारत बांधकाम कामगारांच्या आर्थिक, सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणुन प्रस्तुत विषय "नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन (सन २०११-१२ ते २०२१-२२)अशा आशयाचे अध्ययन बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे झालेले नाही. त्यामुळे बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे रोजगार, उत्पन्न ,शिक्षण, राहणीमान, दरडोई उत्पन्न, कर्ज, भौगोलिक, आर्थिक वैशिष्ट्य , कौटुंबिक परिस्थिती व बांधकाम कामगारांवर कल्याणकारी योजनाचा अर्थिक प्रभाव व

राहणीमान यात झालेला बदल याचां एकंदरीत पहिलाच अभ्यास आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र प्रशासन, जनतेस, विविध संस्थेस व शासनास धोरण ठरवण्यासाठी हे संपूर्ण माहिती उपयोगी पडेल या सर्व दृष्टिकोनातून या अभ्यासाचे महत्त्व आहे.

संबंधित संशोधन साहित्याचा आढावा.

1. कपूर (२०१४) या शोधनिबंधात संशोधकांने आसंघटित क्षेत्रातील कामगारांचे काम आणि राहणीमान समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि संघटित व असंघटित क्षेत्रातील अंतर ओळखण्याचा प्रयत्न केला. असंघटित क्षेत्र हे हंगामी रोजगार आणि कंत्राटी कामाच्या परिस्थितीतद्वारे वैशिष्टयेक्रत आहेत. सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी कायदे नाहीत. या क्षेत्रातील लोकांना खराब आरोग्य परिस्थिती, निकृष्ट कामकाजाचे जीवन आणि कामावर होणारा छळ, अपुरी आणि असमान वेतन रचना, कामाची जास्त, घरांच्या खराब सुविधा, सुरक्षिततेच्या उपायांचा अभाव आणि कामगारांच्या मुलांसाठी योग्य शिक्षण नसणे यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या क्षेत्रातील कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करून आवश्यक ती कार्यवाही करावी.

2. इंडियन लेबर अँड एम्प्लॉयमेंट रिपोर्ट (२०१४) भारतातील कामगार बाजार आणि रोजगाराची स्थिती दर्शवते. त्यात आर्थिक सुधारणा सुरू झाल्यापासून श्रमिक बाजार आणि रोजगारातील बदलांचे विश्लेषण दिले आहे. कामगार बाजार संस्था विविध प्रकारचे रोजगार आणि कामगार बाजार धोरणे पाहून या बदलांची गतिशीलता शोधली आहे. कामगारांची(सुमारे ९२ टक्के) अनौपचारिक रोजगारात गुंतलेली आहे आणि त्यांच्यापैकी बहुतेकांना मर्यादित किंवा शून्य सामाजिक संरक्षण आहे.

3.अल्लुरी बालाजी. (२०१५) यांनी त्यांच्या आभ्यासात कामगारांना मिळणाऱ्या विविध योजनांवर प्रकाश टाकला आहे. इमारत बांधकाम उद्योग हा भारतातील रोजगाराचा प्रमुख स्त्रोत आहे व मोठ्या प्रमाणात कामगार अकुशल असल्याने आपल्या गरजा पुर्ण करण्यासाठी बांधकाम क्षेत्रात काम करतात, सुमारे १५ दशलक्ष लोक काम करत आहेत. औद्योगिकीकरणाच्या आगमनामुळे आणि अलीकडच्या घडामोडींमुळे बांधकाम उद्योगात गुंतलेले कामगार विविध व्यावसायिक विकार आणि मानसिक ताणतणावांना बळी पडतात, या आकस्मिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी मजुरी पुरेशी नाही, या विरोधात सरकार विविध सामाजिक सुरक्षा योजना उपलब्ध करून देत आहे. कामगारांचे कल्याण, परंतु प्रत्यक्षात या योजना बहुसंख्य कामगारांपर्यंत पोहोचत नाहीत.आसे त्यांनी त्यांच्या लिखानात म्हणटले आहे.

4. कल्याणी (२०१५) या लेखात लेखकाने असंघटित कामगारांच्या स्थितीचे विश्लेषण केले आहे. ज्यांना सामान्यतः भारतीय कामगार शक्तीचे मुख्य सामर्थ्य मानले जाते २००९-१० मध्ये नॅशनल सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशन(NSSO) ने केलेल्या सर्वेक्षणानुसार देशातील एकूण रोजगार ४६.५ कोटी होता ज्यात सुमारे २.८ कोटी संघटित आणि उर्वरित ४३.७कोटी असंघटित क्षेत्रातील कामगार होते. हे ओळखले गेले आहे की बहुसंख्य अनौपचारिक रोजगार हे सध्या भारतातील श्रमिक बाजाराच्या परिस्थितीचे एक केंद्रीय वैशिष्ट्य आहे. काउन्टीच्या जीडीपी मध्ये क्षेत्राचा वाटा जवळपास निम्मा असताना, रोजगाराच्या आघाडीवर त्याचे वर्चस्व असे आहे. की एकूण कर्मचाऱ्यापैकी ९० टक्के पेक्षा जास्त लोक अनौपचारिक अर्थव्यवस्थेत गुंतलेले आहेत. औपचारिक क्षेत्राच्या तुलनेत भारतातील अनौपचारिक क्षेत्र कमी उत्पादकता विकराने ग्रस्त आहे. हे सर्वत्र मान्य केले जाते. अन्न, पोषण, आरोग्य, ग्रहनिर्माण, रोजगार, उत्पन्न जीवन आणि अपघात आणि वृद्धपकाळ यासारख्या असंघटित क्षेत्रातील सुरक्षा गरजा सुधारून लेखकाने सुचवले आहे. तरीही असंघटित क्षेत्राचे उद्धार सरकारकडे दुर्लक्ष करतात.

5.रावल (२०१८) यांनी त्यांच्या अभ्यासात भारतातील बांधकाम कामगारांच्या मानसिक तणावावर चर्चा केली आहे , त्याच बरोबर कामाचे हंगामी स्वरूप,कामाच्या ठिकाणी साईटची विखुरलेली आवस्था आणि मिळणारा पगार व कामगार आणि मालकांच्या तात्तपुरत्या संबांधावर चर्चा केली . कामगारांना पगार पेक्षा नियमित काम महत्वाचे आहे.कारण कामगार आपल्या मुलभुत सुविधा पुर्ण करण्यासाठी श्रमाची विक्री करतो. काळानुरूप बदलत जाणारे कामाचे स्वरूप, कामाचे तात्पुरते स्वरूप , सामाजिक सुरक्षा योजनांचा आभाव कामाच्या ठिकाणी मिळणारी अमानवी वागणूक व अनियंत्रित काम आणि आल्प वेतन आशा विविध चाक्रातून जाणारा कामगार या सर्वांचा कामावर आणि कामगारावर प्रभाव पडतो असे मांडले आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे

१. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. बांधकाम कामगारांच्या श्रमशोषणाचे वास्तव अभ्यासने.

३. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कुटुंबातील मुलांचे शैक्षणिक जीवनात कल्याणकारी मंडळाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

४. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणकारी मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या योजनेतील आमलबजावणीतील विविध त्रुटींच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे बांधकाम क्षेत्रातील कामगार संदर्भात योगदान अभ्यासने.

संशोधनाची गृहितके

१. बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे आर्थिक व सामाजिक परिस्थिती हालाखीची आहे.

२. बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे श्रमशोषण होते.

३. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कुटुंबातील शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे.

४. बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी मंडळाच्या कार्यप्रणालीत त्रुटी आढळून येत आहेत.

५. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये नोंदणीक्रत बांधकाम कामगार अल्प असल्याने मंडळाच्या उद्देशाप्रमाने आर्थिक व सामाजिक प्रगती होत नाही.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम सामग्री वर आधारित आहे. "नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन "करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधन सामग्रीत नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच संशोधनाच्या द्रष्टीने बांधकाम कामगार व संबंधित घटकांच्या अनुसुची व मुलाखाती संरक्षण संशोधन पद्धतीने घेण्यात येणार आहे .

तथ्य संकलन पद्धती

सामाजिक समस्यांचे सोडवणूक करणे व समाजाला ज्ञान व त्यांची गरज भागविणे हा मुख्य हेतू संशोधनाचा असतो. यामध्ये विविध घटकावर अभ्यास करण्यात येऊन समस्यांचे सोडवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात येत असतो.

प्राथमिक तथ्य संकलन पद्धती

प्राथमिक तथ्य संकलनामध्ये निवड केलेल्या नोंदणीक्रत बांधकाम कामगारांकडून अनुसूची व मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे आर्थिक सामाजिक व त्यांच्या कुटुंबातील शैक्षणिक स्थितीच्या संदर्भात माहिती गोळा केली जाणार आहे.

द्वितीय तथ्य संकलन पद्धती

प्रस्तुत अभ्यास करण्यासाठी राज्यपातळीवरील, विभागीय पातळीवरील, जिल्हा पातळीवर आवश्यक ती माहिती प्रकाशित झालेल्या माहितीतून घेण्यात येईल दुय्यम स्वरूपाची माहिती प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या सांख्यंकीय गोषवारा, मानव विकास अहवाल, जनगणना अहवाल, राष्ट्रीय नमुना पाहणी समितीचे अहवाल, जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन अहवाल, संशोधनासाठी आवश्यक असणारी पूरक माहिती गोळा करण्यासाठी प्रकाशित ग्रंथ, अप्रकाशित माहिती, शोधनिबंध, शासनाचे अहवाल, वर्तमानपत्रे शोध प्रबंध इत्यादीचा वापर केला जाईल.

नमुना निवड

नांदेड जिल्ह्यात १६ तालुके आहेत. नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन करण्यासाठी जिल्ह्यातील १६ तालुक्यामधील प्रत्येक तालुक्यातून २५ नोंदणीकृत बांधकाम क्षेत्रातील कामगार निवड करण्यात आली आहे. निवड केलेल्या बांधकाम क्षेत्रातील कामगारांची प्रत्यक्ष भेटीतून मौखिक पद्धतीने, अनुसूची द्वारे तथ्यांचे संकलन केले जाणार आहे. अशाप्रकारे नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातून प्रत्येकी तालुक्यातील २५ बांधकाम कामगारांची ४०० नमुना निवड घेऊन प्रमुख अध्ययनासाठी स्तरित याद्रच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली आहे.

संशोधन तंत्र

नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययनाच्या समस्यांची उत्तरे शोधून काढण्यासाठी गोळा केलेली माहिती योग्य पद्धतीत तक्त्यांच्या स्वरूपात मांडली जाईल. त्यांची पुनर पडताळणी केली जाईल. आणि टक्केवारी, सरासरी, सहसंबंध इत्यादी सारख्या संख्यांची साधने वापरले जाईल व मिळालेल्या माहितीचे सादरीकरण विविध आलेखांचा वापर करून मांडला जाईल

संशोधनाचा कालावधी

प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन करण्यासाठी सन २०११-१२ ते २०२१- २२ असा कालखंड निवडण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन क्षेत्र हे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यापुरते आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत १६ तालुक्यातील बांधकाम कामगारांची प्रत्येकी तालुक्यातून २५ नमुना निवड घेऊन नोंदणीकृत बांधकाम कामगारांकडून अनुसूची व मुलाखातीद्वारे व निरीक्षणाद्वारे माहिती संकलित करून बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे आर्थिक, सामाजिक आणि त्यांच्या कुटुंबातील शैक्षणिक स्थितीची माहिती घेऊन अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधन कार्य हे प्राथमिक व दुय्यम साधनसामग्री वर आधारित आहे. प्राथमिक माहिती नमुना निवड पद्धतीने अनुसूची, निरीक्षण व मुलाखतीद्वारे जमा करण्यात येणार आहे. परंतु बांधकाम क्षेत्रातील कामगारांमध्ये निरीक्षरतेचे प्रमाण जास्त आहे तसेच ठेकेदार व मालक यांच्या दबावामुळे माहितीवर मर्यादा पडते तसेच दुय्यम स्वरूपाच्या माहिती योग्य व विश्वासनीय आकडेवारीचा अभाव विविध पद्धतीने जमा केलेली शासकीय आकडेवारी, शासकीय गोपनीयता व अपूर्ण माहितीमुळे समग्र संग्रहणावर मर्यादा पडतात. प्रस्तुत संशोधन फक्त नांदेड जिल्हा पुरतेच मर्यादित राहील माहितीचा अपुरे पणा यासंबंधी मर्यादा राहील.

प्रकरणाची रूपरेषा

1. प्रकरण पहिले : प्रस्ताविक

प्रस्तुत प्रकरणात प्रस्ताविक, विविध कालखंडातील बांधकाम कामगार, कालानुरूप बांधकाम क्षेत्रात सहभाग, जागतिक स्तर ते नांदेड जिल्ह्यातील बांधकाम क्षेत्रातील ऐतिहासिक पार्श्वभूमी, असंघटित क्षेत्र व बांधकाम कामगार, तसेच संशोधन पद्धती इत्यादी बाबींचा या प्रकरणात समावेश असेल.

2. प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे हे बांधकाम क्षेत्रातील कामगार संबंधी निरनिराळ्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये विविध लेखकांनी लिहिलेले ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, संशोधकांनी लिहिलेले शोधनिबंध, प्रबंध आदींचा समावेश करण्यात येईल.

3. प्रकरण तिसरे: बांधकाम क्षेत्रातील कामगार संबंधी नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांची ओळख घेण्यात येणार आहे.

4. प्रकरण चौथे: नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे बांधकाम कामगारांसंदर्भातील विविध खर्च आधारित अध्ययन करण्यात येणार आहे.

5.प्रकरण पाचवे :नांदेड जिल्ह्यातील बांधकाम कामगारासंदर्भात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आर्थिक व सामाजिक भुमिकेचा अभ्यास .

6. प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

अभ्यासांती प्राप्त निष्कर्ष व त्या अनुषंगाने शिफारशी प्रस्तुत प्रकरणात देण्यात येणार आहेत.

संदर्भसूची

प्रस्तुत संशोधन कोण- कोणत्या संदर्भ साहीत्याचा,ग्रथांचा उपयोग करून केले आहे यांचे संदर्भ देण्यात येणार आहे.

संदर्भसूची

1. आलोक जत्राटकर (एप्रिल 2017), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक धोरण. योजना, पृष्ठ क्र .46-47

2. प्रा. शोभा विष्णूपंत खंदारे (2016), सोलापूर जिल्ह्यातील असंघटित क्षेत्राच्या स्थितीचा अभ्यास. GRT प्रकाशन, पृष्ठ क्र.2
3. इंडियन लेबर अँड एम्प्लॉयमेंट रिपोर्ट (2014), इंडियन लेबर अँड एम्प्लॉयमेंट रिपोर्ट 2014 शैक्षणिक फाउंडेशन, नवी दिल्ली,110002.
4. कल्याणी मुना (2015), असंघटित कामगार भारतीय कामगार दलाचे मुख्य ताकद: एक विश्लेषण, इंटरनॅशनल जनरल ऑफ रिसर्च इन बिझनेस स्टडीज अँड मॅनेजमेंट खंड २, अंक १२, डिसेंबर 2015.
5. भारतीय जनगणना अहवाल (2011), महारजिस्टर आणि जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार.
6. .शिरसाट सतीश,(2010), असंघटित कामगार,पुणे विद्यापीठ मुद्रानालय, पुणे विद्यापीठ गणेशखिंड, पुणे, 411077.
7. अल्लुरी बालाजी. (2015), सामाजिक सुरक्षा योजनांच्या संदर्भात बांधकाम मजुरांच्या आकलनावरील अभ्यास. इंटरनॅशनल जर्नल्स ऑफ बिझनेस क्वांटिटेटिव्ह इकॉनॉमिक्स अँड अप्लाइड मॅनेजमेंट रिसर्च.
8. रावल.(2018), चिपळूण, रत्नागिरी जिल्हा, भारतातील असंघटित इमारत बांधकाम कामगारांमध्ये मानसिक ताण आणि मस्क्यूकोस्केलेटल समस्या. वैद्यकीय विज्ञान आणि सार्वजनिक आरोग्याचे आंतरराष्ट्रीय जर्नल.
9. ऑफिशियल वेबसाईट .https://mahabocw.in.

संशोधक **मार्गदर्शक**

किरण बाबुराव फुगारे

सामाजिकशास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड .